# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ७८-२२ दिनांक - ०८/०३/२०२२

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमीत्त मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांकडून विविध उपक्रम व महिला मेळाव्याचे आयोजन.

८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय व सर्व पोलीस ठाण्यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येवून दि. ८ मार्च २०२२ रोजी प्रख्यात लेखिका श्रीमती वीणा गवाणकर यांना पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये निमंत्रीत करुन महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस दलामध्ये कार्यरत महिला अधिकारी व अंमलदार या पोलीस दलामध्ये कर्तव्य करतांना पिडीत महिलांची कशाप्रकारे मदत करुन त्यांना आधार देवून कायदेशीर न्याय मिळवून देवू शकतात याबाबत श्रीमती वीणा गवाणकर यांनी मत व्यक्त केले. तसेच पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांनी महिला दिनाचे औचित्य साधुन मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त शहर दलामध्ये कार्यरत असलेल्या एकुण २८८ महिला अधिकारी व अंमलदार यांना वाचनासाठी विविध प्रकारच्या पुस्तक वाटपाचा उपक्रम हाती घेतला असून सदर कार्यक्रमप्रसंगी उपस्थित महिला पोलीसांना श्रीमती वीणा गवाणकर यांच्या हस्ते काहि पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमप्रसंगी पोलीस आयुक्त श्री सदांनद दाते, अप्पर पोलीस आयुक्त श्री एस जयकुमार, पोलीस उपआयुक्त श्री विजयकांत सागर, श्रीमती पद्मजा बडे, सहा. पोलीस आयुक्त तसेच इतर महिला पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होत्या.





त्याचप्रमाणे महिला दिनाच्या पुर्व संध्येला दिनांक ०७/०३/२०२२ रोजी सायंकाळी १७.०० वा वालीव पोलीस ठाण्याकडुन महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्याकरीता प्रमुख पाहुणे म्हणुन सौ. उज्वला भगत, तहसिलदार तथा कार्य. दंडाधिकारी, वसई, सौ पद्मजा बडे, सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मि.भा.व.वि .आयुक्तालय तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. सौ. नैना कनल, अध्यक्ष, पहीले माझे कर्तव्य फाऊंडेशन अशा मान्यवर महीला तसेच वालीव पोलीस ठाण्यातील महीला पोलीस अधिकारी/अंमलदार, इतर पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या पत्नी, महिला दक्षता कमिटीच्या सदस्या व इतर प्रतिष्ठीत महिला सदर कार्यक्रमास उपस्थित होत्या.

सदर मेळाव्यात उपस्थित महिलांना डॉ. सौ. नैना कनल यांनी ब्रेस्ट कॅन्सर या विषयावर मार्गदर्शन केले. जिल्हा परीषद शाळा, गोखीवरे येथील विदयार्थीनींनी महिलांना प्रोत्साहन देणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच वालीव पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हयातील जप्त केलेला मुद्देमाल ९ तक्रारदार महिलांना एकुण २,७३,०००/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने ताब्यात देण्याची कार्यवाही देखील यावेळी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दि ०८.०३.२०२२ रोजी अंतराष्ट्रीय महिला दिनानिमीत्त वालीव पोलीस ठाणे नेमणुकीस असलेल्या महिला पोलीस उपनिरीक्षक सौ. श्रीलक्ष्मी बोरकर यांनी वालीव पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी म्हणुन कामकाज पाहिले आहे.

सदर कार्यक्रमाप्रसंगी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे व इतर अधिकारी उपस्थित होते.




जागतिक महिला दिना निमीत्त
वालिव पोलिस ठाणे तर्फे
महिला मेळावा
विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
फाऊंडेशन
मीरा - भाईंदर वसई - विरार पोलिस आयुक्तालय
Only a Woman Can
Almost Die and Give Birth
मीरा - भाईंदर वसई - विरार पोलिस आयुक्तालय